| | |
|---|---|
| | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०२६</u>**<br>**<u>मधील अर्ज निशाणी क्र. ४३ खालील आदेश</u>**<br>**<u>(CNR- MHWS050001042026 )</u>** |

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांच्यातर्फे दिनांक १६/६/२०२५ रोजी तहसिलदार मानोरा यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत, पंचनाम्याची प्रत, दिनांक ४/६/२०२५ रोजीचा विनंती अर्ज आणि पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी दिलेला अर्ज यांच्या छायांकीत प्रती दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास वादीच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एस.जी. बाखडे आणि वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.के. रामटेके यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी दाखल करु इच्छित असलेल्या दिनांक १६/६/२०२५ रोजी तहसिलदार मानोरा यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत, पंचनाम्याची प्रत, दिनांक ४/६/२०२५ रोजीचा विनंती अर्ज आणि पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी दिलेला अर्ज यांच्या छायांकीत प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u>** :–

३. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या दाव्यात वादीने तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी क्र. ५ आणि 'जैसे थे' चा आदेश मिळण्यासाठी अर्ज निशाणी क्र. ४१ दाखल केलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी हे त्यांच्या बचावाच्या अनुषंगाने दिनांक १६/६/२०२५ रोजी तहसिलदार मानोरा यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत, पंचनाम्याची प्रत, दिनांक ४/६/२०२५ रोजीचा विनंती अर्ज आणि पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी दिलेला अर्ज यांच्या छायांकीत प्रती दाखल करु इच्छीत आहेत. त्यामुळे प्रतिवादींना त्या छायांकीत प्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट वादीच्या विधीज्ञांनी यांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे या छायांकीत प्रती आहेत व त्या प्रमाणित प्रती नाहीत. त्यामुळे त्या छायांकीत प्रती

दाखल करण्यास वादीचा विरोध आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या दाव्यात वादीने तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी क्र. ५ आणि 'जैसे थे' चा आदेश मिळण्यासाठी अर्ज निशाणी क्र. ४१ दाखल केलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी हे त्यांच्या बचावाच्या अनुषंगाने दिनांक १६/६/२०२५ रोजी तहसिलदार मानोरा यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत, पंचनाम्याची प्रत, दिनांक ४/६/२०२५ रोजीचा विनंती अर्ज आणि पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी दिलेला अर्ज यांच्या छायांकीत प्रती दाखल करु इच्छीत आहेत व त्या छायांकीत प्रती अभिलेखावर आल्या तर दोन्हीही अर्ज निशाणी क्र.५ व ४१ हे गुणदोषावर निकाली काढण्यास त्या छायांकीत प्रती उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे त्या छायांकीत प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि प्रतिवादी यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.४३ मंजुर करण्यात येत आहे आणि प्रतिवादींना त्या छायांकीत प्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.03.27 13:50:08 +0530

स्थळ : मंगरुळपीर ( ध. भ. हंबीरे )
दिनांक :२७/३/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 27.3.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 27.3.2026 |
| Order uploaded on | : | 27.3.2026 |